अतारांकित प्रश्नोत्तरांची १४६ वी यादी

# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## राज्यातील शिक्षणसेवकांना TET/CTET परिक्षा उत्तीर्ण करण्याकरिता मुदतवाढ देणेबाबत

**(१) २०२९२ (१७-१२-२०२०). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिनांक ३० मार्च, २०१९ नंतर TET/CTET उत्तीर्ण होणाऱ्या शिक्षणसेवकांना नियमित नियुक्ती (Approval) मिळण्याकरीता सुधारित शासन निर्णय पारित करून मुदतवाढ देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संदर्भित शासन निर्णयाच्या अनुषंगाने TET/CTET परिक्षा उत्तीर्ण करण्याबाबत अंतिम मुदत दिनांक ३० मार्च, २०१९ देण्यात आली होती परंतु अनेक शिक्षणसेवकांनी दिनांक ३० मार्च, २०१९ नंतर TET/CTET परिक्षा उत्तीर्ण केली असल्याने उक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील महानगरपालिका/ महाराष्ट्र शासनाचे शिक्षण विभागाने सदर शिक्षणसेवकांना नियमित नियुक्ती (Approval) देण्यास नकार दिला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी पाच शिक्षकसेवकांना सहायक शिक्षकाचे मान्यता देऊन सहा महिन्यानंतर परत मान्यता रद्द करुन दिलेले वेतन परत करण्याचे आदेश कोरोना महामारीच्या काळात पारीत केले आहेत तसेच इतर काही शिक्षकांना देखील सेवा समाप्ती आणि अदा करण्यात आलेले वेतन परत करण्याबाबत नोटीस दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शिक्षणासारख्या बहुमुल्य क्षेत्रात काम करणाऱ्या या शिक्षणसेवकांना न्याय मिळण्याकरिता नवीन सुधारित शासन निर्णस पारित करण्यात येवून पुढील दोन वर्षांची TET/CTET परिक्षा उत्तीर्ण करण्याकरीता मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१६-१२-२०२२) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ३५७/२०२० प्रकरणी दिलेल्या आदेशानुसार सदर शिक्षकांना सहायक शिक्षकाच्या पदावर देण्यात आलेल्या वेतनाची वसूली करण्यात आलेली नाही. तसेच सद्य:स्थितीत सदर शिक्षक शिक्षण सेवक पदावर कार्यरत आहेत.

(४) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ अन्वये मुदतवाढ देण्याचे अधिकार राज्य शासनास नसून, याबाबत निर्णय घेण्यासाठी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद हे सक्षम प्राधिकारी आहेत. यापूर्वी शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या शिक्षकांना सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अजून एक अंतिम संधी देण्याबाबतची विनंती राज्य शासनामार्फत केंद्र शासनास करण्यात आली होती. तथापि, केंद्र शासनाने विनंती अमान्य केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बालचित्रवाणी संस्था पुर्नजिवीत व अत्याधुनिक डीटीएच यंत्रणा उपलब्ध करुन देणेबाबत

**(२) ३२८१९ (१२-०१-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना काळात विद्यार्थ्यांना घरी बसून संगणक, मोबाईल व अन्य मार्गाने शिक्षण घेण्यात अनेक अडचणी येत असताना केंद्र सरकारने “स्वयंम्” शैक्षणिक उपग्रह वाहिन्या डिश टिव्ही किंवा दूरदर्शनच्या प्लॅटफॉर्मवर शैक्षणिक शिक्षण सुरु करुन गावोंगावी ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण सुविधा उपलब्ध करुन दिल्याची बाब दिनांक ०५ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागात खेडापाड्यांमधील बहुसंख्य विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान विचारात घेता शासनाने स्वत:ची शालेय शिक्षण देणारी बालचित्रवाणी संस्था त्वरीत पुर्नरजिवीत व अत्याधुनिक डीटीएच यंत्रणा उपलब्ध करुन देणेबाबत अद्याप शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१५-१२-२०२२) :** (१) होय खरे आहे.

(२) तंत्राज्ञानाच्या उपयोग द्वारे राज्यातील विद्यार्थ्यांचे ऑनलाईन पध्दतीने शिक्षण सुरु ठेवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये खंड पडणार नाही याची काळजी घेण्यात येत आहे, DTH TV चॅनेल सुरु करणेबाबत केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या माध्यमातून राज्यात १२ शैक्षणिक चॅनेल सुरु करण्याचा मानस आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील समुपदेशक शिक्षकांबाबत

**(३) ३२९५८ (१२-०१-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करोनामुळे मागील दिड वर्षापासून घरात असलेल्या विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला असून त्यांना समजून पुढची दिशा देण्यासाठी राज्यात अवघे ४२६ समुपदेशक प्रशिक्षित शिक्षक आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक शाळेसाठी एक शिक्षक असावा असे असताना देखील समुपदेशकांची संख्या कमी असल्यामुळे ५ शाळांना मिळून एक समुपदेशक असल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शिक्षकांची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१५-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे

(२) व (३) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे येथे व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन विभाग स्थापन करण्यात आला तसेच राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमध्ये समुपदेशन केंद्र कार्यान्वित करण्यात आले. या जिल्हा समुपदेशन केंद्रावर समुपदेशकांची प्रतिनियुक्ती करण्यात आलेली आहे त्यांच्या माध्यमातून जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शन समुपदेशन व करिअर मार्गदर्शन विषयक उपक्रम राबविले जात आहेत.

राज्यातील समुपदेशन व मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांची संख्या वाढविण्यासाठी सन २०१७ - १८, २०१८-१९ व २०१९-२० मध्ये अविरत प्रशिक्षण अनुक्रमे टप्पा १ ते त ३ आयोजित करण्यात आले. त्या प्रशिक्षणाद्वारे राज्यातील शासकीय शाळांमधील ३८९८८ शिक्षकांना करिअर मार्गदर्शन व समुपदेशनाबाबतचे प्रशिक्षण देण्यात आले असून सध्या हे सर्व प्रशिक्षित शिक्षक आपल्या शाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशनाचे काम करीत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## शिक्षकांचे वरिष्ठ व निवडश्रेणीचे प्रशिक्षण आयोजित न केल्याने हजारो शिक्षक वरिष्ठ व निवड वेतनश्रेणीपासून वंचित असल्याबाबत

**(४) ३३३८६ (१२-०१-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकांना वरिष्ठ व निवडश्रेणीचे प्रशिक्षण आयोजित न केल्याने हजारो शिक्षक वरिष्ठ व निवड वेतनश्रेणीपासून वंचित असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शिक्षकांचे आर्थिक नुकसान झाले आहे त्यामुळे तातडीने प्रशिक्षण आयोजित करावे अशी मागणी शिक्षकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय होत नसल्यामुळे शिक्षकांसाठीची सेवांतर्गत प्रशिक्षण घेण्याची अट रद्द करावी व सर्व शिक्षकांना १२ व २४ वर्षाच्या सेवेनंतर वरिष्ठ व निवड श्रेणी विना विलंब देण्याबाबत शासनाकडे मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१५-१२-२०२२) :** (१) ते (४) शासनाने प्रशिक्षणाबाबत २० जुलै,२०२१ व २२ ऑक्टोबर,२०२१ सुधारित शासन निर्णय निर्गमित केले असून त्यानुसार सद्यस्थितीत राज्यातील शिक्षकांचे वरिष्ठ व निवडश्रेणी करीता आवश्यक प्रशिक्षण ऑनलाईन घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## अनुदानित शाळांमधील कायमस्वरुपी शिपायांची पदे रद्द करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(५) ३४४५९ (१२-०१-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुदानित शाळांमधील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या रिक्त असलेल्या हजारो पदांची भरती प्रक्रियासंदर्भात शासनाने विविध समित्या स्थापन केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समित्यांनी शासनास सादर केलेल्या अहवालानुसार, पदे भरती प्रक्रियेची अंमलबजावणी करण्याऐवजी शासनाने शाळेतील शिपायांचीच पदे भरणे कायमची रद्द करण्याचा व त्याऐवजी त्या रिक्त पदावर मानधन देऊन शिपाई नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शिपाई पदावरील कायमस्वरुपी कर्मचारी नसल्याने शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा व गोपनिय कामामधील विश्वासार्हता राहणार नसल्याने राज्यातील शिक्षण संस्थांनी या निर्णयास विरोध दर्शवून पूर्ववत भरती प्रक्रिया राबवून शिपाई पदाची पूर्णवेळ नियुक्ती करावी अशी शासनाकडे मागणी केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्नोक्त भाग ३ मधील मागणी विचारात घेता शासनाने त्याबाबत पुढे कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१६-१२-२०२२) :**(१) हे खरे नाही.

(२) शासन निर्णय दिनांक ११.१२.२०२० अन्वये सर्व खाजगी अनुदानित/अंशत: अनुदानित माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांतील चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांसाठी ठोक स्वरूपात शिपाई भत्ता देण्याची तरतूद करण्यात आली आहे. इतर शिक्षकेत्तर पदे भरण्याबाबत वित्त विभागाची मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) प्रश्न क्र.३ येथील मागणीच्या अनुषंगाने शिपाई पदाची पूर्णवेळ नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पालघर जिल्ह्यातील सरळ सेवा भरती प्रक्रियेबाबत**

**(६) ३४६२४ (१२-०१-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील सरळ सेवा भरती प्रक्रिया सोपी व सोयिस्कर करण्याकरिता शेकडो पात्र आदिवासी उमेदवारांनी पालघर जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण केले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी परीक्षा न घेता आदिवासी विकास विभागाच्या धर्तीवर जिल्ह्यातील परिस्थिती यावर अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी घेण्यात यावी असे कृती समितीने मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१७ नंतर ही परीक्षा झालेली नसल्याने आदिवासी विकास विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार शिक्षक भरतीच्या धरतीवर जिल्हा निवड समितीद्वारे पालघर पेसा क्षेत्रातील शिक्षक भरती करावी ती पवित्र या भरती पोर्टलवरुन करण्यात येऊ नये अशी मागणी उमेदवारांमार्फत करण्यात येत आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१५-०२-२०२३) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) शिक्षकांची नियुक्ती पारदर्शक पध्दतीने व्हावी, याकरीता मा. उच्च न्यायालय यांच्या निर्देशानुसार पवित्र पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे. पेसा क्षेत्रातील पदांच्या भरतीस मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड-म्हाळसजवळा - लवुळ- नित्रुड- जिवनापुर रामा- ५५ या (ता. माजलगाव जि. बीड)**
**या रस्त्याच्या बनावट भूसंपादन प्रस्तावाबाबत**

**(७) ३८१६७ (१९-०४-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड-म्हाळसजवळा - लवुळ- नित्रुड- जिवनापुर रामा- ५५ या रस्त्यावर श्री. विनायक वचिष्ठ शिंदे रा. लवुळ (ता. माजलगाव जि. बीड) यांचा बनावट भूसंपादन प्रस्ताव सादर करून शासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी तत्कालीन कार्यकारी अभियंता यांना निलंबित करणेबाबत श्री. गणेश साहेबराव लांडगे रा.माजलगाव जि.बीड यांनी सचिव (रस्ते), सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दिनांक ०८ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अभिलेखांच्या पडताळणी अंती सदर रस्त्याच्या भूसंपदनाची आवश्यकता नसल्याचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांना आढळून आले. त्यामुळे, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी जून २०१९ च्या अर्थसंकल्पात मंजूर असलेले भूसंपादनाचे काम रद्द करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर काम अर्थसंकल्पातून वगळण्यात आले असून सदर कामावर प्रत्यक्षात कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयात एकही हंगामी वसतिगृह सुरु नसल्याबाबत**

**(८) ३९११४ (०९-०४-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयात एकही हंगामी वसतिगृह सुरु नसल्याचे माहे डिसेंबर,२०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयात वसतिगृह नसल्याने विद्यार्थी त्यांच्या पालकांसोबत स्थलांतरित होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास ,जिल्हयात दोन वर्षापूर्वी हंगामी वसतिगृह सुरु करण्यात आले होते, परंतु शाळा व्यवस्थापन समितीला तीन महिन्याचा अग्रीम निधी व संपूर्ण सहा महिन्यांचा निधी दिला नाही हे खरे आहे काय,
(४) असल्यास, गत दोन वर्षापूर्वीची सुमारे २० ते २२ लाख रुपयांची देयके थकित असून जिल्हयात हंगामी वसतिगृहे नसल्यामुळे जिल्हयातील सुमारे २,५०० विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत हेही खरे आहे काय,
(५)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, शासन स्तरावर पुढे काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिपक केसरकर (०२-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.
(५) हिंगोली जिल्ह्यामध्ये एक गाव एक बालरक्षक ही चळवळ शाळाबाह्य, स्थलांतरीतांच्या पाल्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याकरिता व स्थलांतरण रोखण्यासाठी अतिशय प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. माहे फेब्रूवारी,२०२२ मध्ये स्थलांतरीतांच्या पाल्यांची माहिती घेतली असता बालरक्षकांच्या मदतीने स्थलांतरण रोखण्यात यंत्रणेस यश प्राप्त झाले आहे. त्यामुळे गटशिक्षणाधिकारी यांनी सन २०२१-२२ मध्ये हंगामी वसतीगृहाची आवश्यकता नसल्याचे कळविले आहे.

---

**अप्रशिक्षित शिक्षकांना पेन्शनचा लाभ मिळणेबाबत**

**(९) ४००१३ (०९-०४-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अप्रशिक्षित शिक्षक (untrained) शासनाच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडे सन १९७६ व त्यापूर्वीच्या कालावधीत एस.एस.सी.पास प्रशिक्षित (अनट्रेड) शिक्षकांची त्या काळानुरुप नेमणूका झाल्या होत्या ते सर्व शिक्षक २००८ व त्याच्या समकालीन निवृत्त झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे अप्रशिक्षित किंवा (untrained) शिक्षक महाराष्ट्रात सध्या १६२६ इतके असून त्यापैकी निवृत्त झालेल्या शिक्षकांना अद्यापपर्यंत पेन्शनचा लाभ झाला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १ जुलै, १९७२ नंतर नियुक्त अप्रशिक्षित शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन व तद्रनुषंगिक लाभ अनुज्ञेय करणेबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०२ ऑगस्ट,२०२१ रोजी निवृत्तधारकांच्याबाजूने सकारात्मक निर्णय दिला असूनही अखेरपर्यंत अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच सन २००८ या कालावधीत निवृत्त झालेले अनेक निवृत्तीधारक मृत्यूमुखी पडले आहेत तरी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासन यावर गांभिर्याने कार्यवाही करणार आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०९-१२-२०२२) :** (१) ते (४) दि. ०१ जुलै, १९७२ नंतर नियुक्त झालेल्या अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांना त्यांनी केलेल्या सेवेनुसार सेवानिवृत्ती वेतन देण्याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित रिट याचिकांमधील आदेशांची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे यांना दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२२ रोजी सूचना निर्गमित करण्यात आली आहे.त्या अनुषंगाने संबंधित अप्रशिक्षित शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतनाचे लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील खेडी-गोंडपिंपरी रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१०) ४०५३१ (१०-०४-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील खेडी-गोंडपिंपरी रस्त्याचे काम गत ३ वर्षापासून आजपावेतो अपूर्णावस्थेत असल्याचे माहे २५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील मार्गावर दोन्ही बाजूने खोदकाम केल्यामुळे अपघात होऊन अनेक निरपराध व्यक्तींना जीव गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी रस्त्याचे काम करणाऱ्या संबंधित कंपनीवर कारवाई करण्याची मागणी स्थानिकांतून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील अपूर्णावस्थेत असलेल्या रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबात तसेच अपघातात मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या कुटूंबियांना आर्थिक मदत मिळण्याबाबत
शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०२-२०२३) :** (१) सदर काम भौतिकदृष्ट्या ७५ टक्के पूर्ण झाले असून उर्वरित काम जून, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(२) सदर रस्त्यावर वाहन चालकाने भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, अविचाराने वाहन चालविल्याने, वाहनांची धडक झाल्याने ५ व्यक्तींचा मृत्यू झाल्याची नोंद संबंधीत पोलीस ठाणे येथील FIR मध्ये आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सदर काम ७५ टक्के पूर्ण झालेले असून उर्वरित काम जून, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सदर रस्त्यावर वाहन चालकाने भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, अविचाराने वाहन चालविल्याने, वाहनांची धडक झाल्याने ५ व्यक्तींचा मृत्यू झाल्याची नोंद संबंधीत पोलीस ठाणे येथील FIR मध्ये असल्याने विभागामार्फत या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इगतपुरी-त्र्यंबकेश्वर ( जि.नाशिक ) येथील गोंदे-वाडीव या औद्योगिक वसाहतीतील बेरोजगारांना अतिप्राधान्याने नोकरी मिळणेबाबत**

**(११) ४१३०९ (०९-०४-२०२२). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इगतपुरी-त्र्यंबकेश्वर ( जि.नाशिक ) येथील गोंदे-वाडीव-हे औद्योगिक वसाहत तसेच इगतपुरी , पाडळी, मुंढेगाव, कु-हेगाव, बेलगाव या ठिकाणी असलेल्या कंपन्यांमध्ये स्थानिक बेरोजगारांना अतिप्राधान्याने नोकरी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य व कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार कंपन्यांमध्ये स्थानिक बेरोजगारांना नोकरी देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१६-१२-२०२२) :**(१) विषयांकीत निवेदनाची प्रत प्राप्त झालेली नाही.
(२) महाराष्ट्रातील स्थानिक युवकांना रोजगारांमध्ये प्राधान्य देण्याचे धोरण राज्य शासनाने सुरुवातीपासून अंगिकारले आहे. दि.१७/११/२००८ च्या शासन निर्णयानुसार सर्व औद्योगिक उपक्रमांमध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीमध्ये किमान ५० टक्के व पर्यवेक्षकीय सहित इतर श्रेणीत किमान ८० टक्के स्थानिक उमेदवारांना नोक-या देणे बंधनकारक आहे. राज्याच्या औद्योगिक धोरणानुसार उद्योगांना प्रोत्साहने/सवलती देतांना संबंधित घटकाने राज्य शासनाच्या स्थानिक लोकांना रोजगार संधीबाबत विहित केलेल्या निकषांची पूर्तता होत असल्याची खातरजमा करण्यात येते.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) येथील नवीन अभ्यासक्रम/विषय/विशेषस्तर विषय अतिरिक्त तुकडी/विद्या शाखा मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावाला मंजूरी मिळण्याबाबत**

**(१२) ४१५८७ (०९-०४-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता विना अनुदानित तत्वावर नवीन अभ्यासक्रम/विषय/विशेषस्तर विषय अतिरिक्त तुकडी/विद्या शाखा इत्यादीच्या मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावाला मंजूरी मिळण्यासाठी मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना दिनांक २१ ऑगस्ट,२०२१ रोजी वा त्यासुमारस लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने सदर निवेदनावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२२-०२-२०२३) :** (१) विभागाच्या अभिलेखावरुन असे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत ता.भोर, जि.पुणे अंतर्गत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, शंकरराव भेलके कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नसरापूर, ता.भोर, जि. पुणे या महाविद्यालयास वाणिज्य व व्यवस्थापन

विद्याशाखेअंतर्गत एम.कॉम. या नवीन अभ्यासक्रमास दि.१५ जून, २०२१ रोजी शासन मान्यता देण्यात आली असून राजगड ज्ञानपीठाचे अनंतराव थोपटे महाविद्यालय, भोर, ता. भोर, जि.पुणे या महाविद्यालयाने सादर केलेला प्रस्ताव शासनाने दि.१२ जुलै, २०२१ रोजी नामंजूर करण्यात आल्याचे विद्यापीठास कळविले आहे. त्यानुसार विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयास दि.१०.०८.२०२१ च्या पत्रान्वये कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमानुसार सुविधा मिळण्याबाबत**

**(१३) ४३७८३ (०४-०४-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना नियमानुसार सुविधा मिळत नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या शाळांकडून नियमानुसार किमान वेतन मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०१-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे. माहे फेब्रुवारी २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात तक्रार प्राप्त नाही. तथापि, दि. ८/१०/२०२१ रोजी तक्रार प्राप्त झाली आहे.
(२) उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), चंद्रपूर यांनी दिनांक १३/१०/२०२१ रोजी सर्व शाळा मुख्याध्यापक व संस्थाचालक सर्व माध्यमाच्या शाळांना पत्र देऊन कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील इंग्रजी शाळांमध्ये मोठया प्रमाणात शुल्क वाढीवर नियंत्रण ठेवण्याबाबत**

**(१४) ४३९१४ (०४-०४-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील इंग्रजी शाळांमध्ये मोठया प्रमाणात शुल्कामध्ये वाढ करण्यात आली असल्यामुळे पालकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इंग्रजी शाळांमध्ये वाढविण्यात आलेल्या शुल्कांवर वचक ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१५-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेड, दापोली, मंडणगड (जि. रत्नागिरी) येथील शासकिय कार्यालयातील उप अभियंत्यांची व शाखा अभियंत्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१५) ४५५०९ (२१-०९-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील खेड, दापोली, मंडणगड येथील जिल्हा परिषद बांधकाम व जिल्हा परिषद पाणी पुरवठा

विभागातील उपअभियंत्यांची व शाखा अभियंत्यांची पदे मागील वर्षापासून रिक्त असल्याचे माहे मे,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उपअभियंत्यांची व शाखा अभियंत्यांची पदे रिक्त राहण्यामागची कारणे काय आहेत व सदरहू पदे रिक्त असल्यामुळे अनेक विकास कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हा परिषद बांधकाम व जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागातील उपअभियंत्यांची व शाखा अभियंत्यांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-१२-२०२२) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
उप अभियंता, जि. प.(बांध) उप विभाग दापोली व उप अभियंता, जि.प.(बांध.) उप विभाग, खेड ही २ पदे मंजूर असून सदर उप अभियंत्यांची पदे भरण्यात आली आहेत. सदर उप विभागांतर्गत शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंत्यांची १८ पदे मंजूर असून त्यापैकी १० पदे भरलेली व ८ पदे रिक्त आहेत.
जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, दापोली व लघु पाटबंधारे उप विभाग, मंडणगड येथील उप अभियंत्यांची पदे भरण्यात आली आहेत. जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, खेड येथील उप अभियंता हे पद रिक्त आहे. सदर उप विभागांतर्गत शाखा अभियंता/ कनिष्ठ अभियंत्यांची १७ पदे मंजूर असून त्यापैकी ६ पदे भरलेली व ११ पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे जि.प. कडून भरली जाणे अभिप्रेत आहे.
(३) सदरहू रिक्त पदे पदोन्नती/सरळसेवेने भरण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील रस्त्यांच्या निकृष्ट बांधकामाबाबत

**(१६) ४५८८९ (२५-०९-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील रस्त्यांची नुकतीच कामे करण्यात आली असून सदरहू रस्त्यांवर डांबर टाकून निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्त्याच्या आजूबाजूला मोठे खड्डे खोदण्यात आले असून अद्यापही तेथे दिशादर्शक फलक न लावल्यामुळे व रस्त्याचे कामही बंद असल्यामुळे रस्त्यावरील अपघातांच्या संख्येत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यात बुलढाणा जिल्हयात झालेल्या २०१ अपघातांपैकी ११९ प्रांणातिक अपघात घडले असुन यामध्ये एकंदर १३५ जणांचा मृत्यु झाला असल्याचे माहे जुन, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ?
(४) असल्यास, या जिल्हयातील रस्त्यांवरील अपघात टाळण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, सदरहू रस्त्याची गुण नियंत्रण विभागाकडून तपासणी करून या प्रकरणातील दोषींवर तसेच संबंधित कंत्राटदार यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०२-२०२३) :** (१) नाही.
(२) बुलढाणा जिल्हया अंतर्गत रस्ते वाहतूकीकरिता सुस्थितीत असून, आवश्यक ठिकाणी दिशादर्शक फलक लावण्यात आलेले आहेत.
(३) गृह विभागाच्या अहवालानुसार बुलढाणा जिल्हयात माहे जानेवारी ते एप्रिल-२०२२ या कालावधीमध्ये एकूण १२२ प्राणांतिक अपघात घडलेले असून त्यामध्ये एकूण १३३ इसम मयत झालेले आहेत. सदरचे अपघात प्रामुख्याने वाहन चालकाने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालविल्याने झाल्याची नोंद आहे.

(४) बुलढाणा जिल्हया अंतर्गत देखभाल दुरुस्ती करीता असलेले राज्यमार्ग व प्रमुख जिल्हामार्ग रस्त्यांवर जागो जागी दिशादर्शक फलक, गतीरोधक, थर्मोप्लास्टीक पेंटचे पट्टे, हर्जाडमार्कर व सुचना फलक इत्यादी लावण्यात आलेले आहेत.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यात पुरवठा अधिकाऱ्याची नेमणूक करण्याबाबत

**(१७) ४६९९० (१६-०९-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यात पुरवठा अधिकारी नसल्याने व वाहतूक यंत्रणा सदोष असल्यामुळे गरीब कल्याण योजना निरुपयोगी होऊन जिल्ह्यातील प्राधान्य कुटुंबातील पंधरा लाख लाभार्थी या योजनेपासून वंचित असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची यंत्रणा सुधारून बुलढाणा जिल्ह्यासाठी पुरवठा अधिकारी नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. रविंद्र चव्हाण (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
माहे मे, २०२२ बुलडाणा जिल्हयाकरिता शासनाने मंजूर केलेल्या प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेच्या गहू व तांदूळ एकूण ९०७९० क्विंटल नियतनाची उचल पूर्ण करण्यात आली आहे. माहे मे, २०२२ या महिन्यात नियमित योजनेचे ऑनलाईन वितरण ९२.५५% व प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेचे ऑनलाईन वितरीत ९३.४०% आहे. त्यामुळे माहे मे, २०२२ या महिन्यात वाहतूक यंत्रणा सदोष असल्याचे दिसून येत नाही.
(२) महसूल व वन विभागाचे दिनांक ९ डिसेंबर, २०२२ च्या शासन आदेशानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा या पदावर श्री.प्रविण ठाकरे, उपजिल्हाधिकारी यांना पदस्थापना देण्यात आली आहे. मात्र अद्यापपर्यंत ते रुजू न झाल्याने जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा या पदाचा पदभार तहसिलदार बुलढाणा श्री.आर.पी.खंडारे यांच्याकडे तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आला होता. परंतु ते रजेवर गेल्यानंतर तुर्त श्री.व्ही.डी.पाटील सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलडाणा यांच्याकडे जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी अतिरिक्त कार्यभार सोपविलेला आहे. तसेच सदर पद उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिका-यामधून भरण्याची महसूल व वन विभागास विनंती करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## येरली (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील पूर्व माध्यमिक शाळा अनुदानित दाखवून कर्मचाऱ्यांना पेन्शनसह इतर सुविधांचा लाभ घेतल्याबाबत

**(१८) ४८१११ (२५-०९-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येरली (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील विनाअनुदानित पूर्व माध्यमिक शाळा १०० टक्के अनुदानित दर्शवून येथील कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्ती लाभासह अन्य लाभ घेतल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शालेय शिक्षण विभागाच्या अपर मुख्य सचिवांना तक्रारीचे निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१२-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) विभागीय शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर यांच्या दि.२४/०६/२०२२ रोजीच्या अनुषंगाने चौकशी समिती नेमली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव (जिल्हा नाशिक) शाकंबरी पुलाची उंची कमी असल्याने पावसाळयात पुलाखाली पाणी साचून परिसरातील गावांचा संपर्क तुटत असल्याबाबत**

**(१९) ४८२५९ (०९-११-२०२२). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव तालुक्यातील लक्ष्मीनगर-मांडवड दरम्यान असलेल्या शाकंबरी पुलाची उंची कमी असल्याने पावसाळयात पुलाखाली पाणी साचून परिसरातील गावांचा संपर्क तुटत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाच्या मोऱ्या मोकळया करुन पाणी पुलाखालून जाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी प्रशासनाकडे वारंवार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची पहाणी केली आहे काय, पहाणीच्या अनुषंगाने पुलाखालील पाणी जाण्याची व्यवस्थेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपायोजना करण्यात आल्या आहेत तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर फरशीच्या मो-या मोकळया केल्या असून रस्ता वाहतूकीसाठी सुरळीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकरावीच्या प्रवेशासाठी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सक्तीचे करण्यात आल्याबाबत**

**(२०) ४८४९४ (२३-०९-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शालेय शिक्षण विभागाने व्यावसायिक अभ्यासक्रमांप्रमाणे इयत्ता अकारावीच्या प्रवेशासाठी गेल्या दोन वर्षापासून नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची सक्ती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील अनेक वर्षे प्रमाणपत्राबाबत सक्ती नसताना तसेच नॉन क्रिमीलेअर प्रमाण वेळेत प्राप्त न झाल्याने विद्यार्थी प्रवेशा पासून वंचित राहत असल्याने पालकांनी सदर अट तातडीने रद्द करण्याची मागणी दिनांक २० जून,२०२२ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र टाईम्स् वृतपत्रातून केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पालकांच्या विनंती नुसार एका वर्षापुरती नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची सक्ती स्थगीत करण्याबाबत शासन विचारधिन आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :**(१) इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेशासाठी प्रवर्गानुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
(२) यासंदर्भात महाराष्ट्र टाईम्स वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती.

(३) इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेशासाठी नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी ३ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथे बेकायदा उत्पादीत सीलबंद पाण्याच्या बाटल्या जप्त केल्याबाबत**

**(२१) ४८४९६ (२०-०९-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे भारतीय मानके ब्युरोने दिनांक २० जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास छापा टाकून ४९०० बेकायदा उत्पादीत केलेल्या सीलबंद पाण्याच्या बाटल्या जप्त केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने संबंधित बेकायदा उत्पादन करणाऱ्यांविरुध्द कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०२-२०२३) :** (१)होय,
(२) ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड मुंबई या कार्यालयाच्या तपासणी पथकाने दिनांक १७/६/२०२२ रोजी बीआयएस मानक चिन्हाच्या गैरवापराबाबत मेसर्स बालाजी इंटरप्रायझेस, वेहेले, ता. भिवंडी, जि. ठाणे या आस्थापनेची तपसणी केली. सदर तपासणीमध्ये उपरोक्त आस्थापना बीआयएस कडून वैध परवाना प्राप्त न करताच सिलबंद पाण्याच्या बाटल्यांवर बीआयएस मानक चिन्हाचा गैरवापर करुन भारतीय मानके कायदा, २०१६ चे कलम १७ चे उल्लंघन करीत असल्याचे आढळून आले. यास्तव सदर आस्थापनेत उत्पादित केलेल्या ५०० मि. लि. सिलबंद पाण्याच्या ४९०० बाटल्या जप्त करण्यात आल्या असून सदर आस्थापनेविरुध्द मा. भिवंडी न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**पैठणी क्लस्टर येवला (जि.नाशिक) या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत**

**(२२) ४९४८८ (१८-०१-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एसएसआय-सीडीपी या राज्य शासनाच्या योजनेअंतर्गत पैठणी क्लस्टर येवला (जि.नाशिक) या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनास प्रस्ताव पाठवण्याची दिनांक २ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उद्योग सहसंचालक नाशिक विभाग नाशिक यांनी सुद्धा शासनाला सविस्तर अहवाल आणि निदानोपयोगी अभ्यास अहवाल बाबत कार्यवाही करण्याचे दिनांक २३ जून २०२२ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनास प्रस्ताव सादर झालेला आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग (३) मधील प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) प्रश्न भाग (३) मधील प्रस्ताव अद्याप शासनास पाठविलेला नसल्यास शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०८-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) होय, हे खरे आहे,
(३) राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (एमएसआयसीडीपी) अंतर्गत मे. पैठणी कलाकारी

क्लस्टर, येवला ता. येवला, जि. नाशिक या औद्योगिक समूहाचा निदानोपयोगी अभ्यास अहवाल उद्योग संचालनालयास दिनांक १५.०२.२०२३ रोजी प्राप्त झाला असून उद्योग संचालनालयाव्दारा प्रस्तावाची छाननी प्रक्रिया पुर्ण करण्यात आली आहे.
(४) सदर प्रस्ताव पुढील मान्यतेसाठी विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय औद्योगिक समूह संनियंत्रण समितीच्या मार्च २०२३ कालावधीत प्रस्तावित बैठकीत कार्यसूचीवर समाविष्ट करण्यात येत आहे.
(५) उपरोक्त नमूद विविध टप्प्यांतर्गत कार्यवाही झालेली असल्याने विलंब झालेला नाही.

---

**मुंबई विद्यापीठाकडे १०० हून अधिक अध्यापकांच्या पदोन्नतीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(२३) ४९५०८ (१८-०१-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाकडे १०० हून अधिक अध्यापकांच्या पदोन्नतीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अध्यापकांच्या सेवांतर्गत प्रगति योजनेची प्रकरणे विनाविलंब निकाली काढण्याचे आदेश असतांनाही विद्यापीठांकडून यासाठी आवश्यक शिबिरांचे आयोजनच केले जात नसल्याने प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार प्रलंबित प्रस्ताव विनाविलंब निकाली काढण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२२-०२-२०२३) :**(१) (२) (३) मुंबई विद्यापीठाने अध्यापकांचे करीअर ॲडव्हान्समेंट स्कीम अंतर्गत प्राप्त पदोन्नतीचे प्रस्ताव निकाली काढलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठाच्या नव्या कुलगुरूची निवड ही जुन्या सार्वजनिक विद्यापीठ कायद्यानुसार होणार असल्याबाबत**

**(२४) ४९५३१ (१८-०१-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या नव्या कुलगुरूची निवड जुन्या सार्वजनिक विद्यापीठ कायद्यानुसार होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नव्या कुलगुरूच्या निवडीसाठी समिती जाहीर होणे, निवड प्रक्रियेची जाहिरात प्रसिद्धी होणे, अर्जासाठी मुदत, पडताळणी, मुलाखत अशी मोठी प्रक्रिया होणार असल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठास नवे कुलगुरू मिळेपर्यंत तीन महिन्याच्या कालावधी जातो अशा परिस्थितीत शासकीय विद्यापीठांना पूर्णवेळ कुलगुरू नसल्याने विद्यापीठांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी कुलगुरू निवृत्त होण्याच्या किमान तीन महिन्यापूर्वी राज्यपाल कार्यालयामार्फत निवड प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रभारी कुलगुरू, प्रकुलगुरू आणि अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात धोरणात्मक निर्णय घेतले जाणार नसल्याने विद्यापीठातील विद्यार्थांचे शैक्षणिक नुकसानाबरोबर अनेक विद्यार्थी हिताच्या प्रकल्पांना आळा बसणार असल्याने शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१६-०२-२०२३) :**(१) नाही.
(२) खरे आहे.
(३) खरे आहे.
(४) मा. सर्वोच्च न्यायालयातील सिव्हील याचिका क्र. १५२५/२०१९ प्रकरणातील निर्देशानुसार कुलगुरु पदाच्या अर्हतेमध्ये बदल करणे व कुलगुरु पदाच्या शोध- नि-निवड समितीवर अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग यांनी नामनिर्देशित केलेल्या सदस्यांचा समावेश करणे आवश्यक झाल्याने तशी सुधारणा सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये करण्यात आली असून त्यानुसार कुलगुरु निवडीची प्रक्रिया लवकर पार पाडण्यात येणार आहे
(५) लागू नाही

---

**रत्नागिरी जिल्हयातील मौजे बहिरवली (ता.खेड) ते मौजे करंबवणे (ता.चिपळूण) खाडीपुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२५) ४९६१२ (१८-०१-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील मौजे बहिरवली (ता. खेड) ते मौजे करंबवणे (ता. चिपळूण) या दोन तालुक्यांना जोडणाऱ्या व सन २०१७-२०१८ मध्ये मंजुरी मिळालेल्या खाडीपुलाचे काम पूर्णत्वास जाण्यासाठी आवश्यक त्या परवानग्या प्राप्त करून घेण्यासाठी खासगी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्याच्या कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीत असल्याचे मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांनी सभागृहात सांगितले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रिया पूर्ण होवून खाजगी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे काय आणि सदर सल्लागाराकडून आवश्यक त्या सर्व परवानग्या प्राप्त करून घेण्यात आल्या आहेत काय,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत आणि विलंब करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) तज्ञ सल्लागाराची नेमणूक करणेबाबतची निविदा स्विकृत करण्यात आली असून, कार्यारंभ आदेश निर्गमित करुन आवश्यक परवानग्या प्राप्त करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**आंबेत पुलाचे चुकीचे ऑडिट केल्याबाबत**

**(२६) ४९६१४ (२६-१२-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आंबेत पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करतांना पाण्याखालील बीमचे ऑडिट न करता केवळ स्लॅबची तपासणी केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची केरळच्या एका हाय टेक्निशियन एजन्सीने नव्याने तपासणी केली असता या पुलाच्या दोन नंबर पिलरला पाण्याखाली कॉक्रीटच नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त एजन्सीने सादर केलेल्या अहवालात पुलाच्या बांधकाम साहित्यासंदर्भात शंका निर्माण केली असल्याचे नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तसेच चुकीचे ऑडिट करणा-यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१३-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

आंबेत गावाच्या बाजूने पूलाचा पिलर हा अंशत: प्रवाहाच्या खालील बाजूस झुकल्याचे जानेवारी, २०२२ मध्ये निदर्शनास आले. त्यामुळे पिलरच्या पायाची पाण्याखालील पाहणी चेन्नई स्थित एजन्सीमार्फत फेब्रुवारी २०२२ मध्ये करण्यात आली. सदर निरीक्षणामध्ये आंबेत गावाच्या बाजूने पूलाचा पिलर क्षतिग्रस्त झाल्याचे आढळून आले.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्री क्षेत्र ऋध्दपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्याबाबत**

**(२७) ४९६६३ (१९-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात श्रीश्रेत्र ऋध्दपूर येथे मराठी भाषेचे विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला असल्याचे मा.उपमुख्यमंत्री यांनी नाशिक येथे झालेल्या अखिल भारतीय महानुभाव महासंमेलनात जाहीर केले असल्याचे दिनांक ३० मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने विद्यापिठ स्थापनेकरीता २९८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याचेही मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे काय तसेच याकरीता मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२३-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही; रिद्धपूर येथे मराठी भाषेचे विद्यापीठ सुरु करण्याची मागणी रास्त असून, याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे नाशिक येथील अखिल भारतीय महानुभव महासंमेलनाच्या दिनांक ३० ऑगस्ट, २०२२ रोजीच्या कार्यक्रमात सांगण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हा रूग्णालयाच्या दुरूस्तीबाबत**

**(२८) ४९७५१ (१८-०१-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हा रूग्णालयाच्या दुरूस्तीसाठी पहिल्या टप्प्यात १० कोटी रूपये देण्याची घोषणा मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिनांक २७ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे आहे काय,

(२) असल्यास, ही रक्कम मंजूर होवून रूग्णालयाच्या दुरूस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे काय,
(३) नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
दि.२७/०८/२०२२ रोजी जिल्हा शासकीय रुग्णालय, रत्नागिरी येथील इमारतीची पाहणी करुन जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या दुरुस्तीबाबत सूचना दिलेल्या आहेत.
(२) सद्य:स्थितीत जिल्हा रुग्णालय रत्नागिरी आवारामधील विविध इमारतींच्या दुरुस्तीची रु.५४२.६४ लक्ष इतक्या रक्कमेची एकूण १० कामे मंजूर आहेत. त्यातील रु.९२.५० लक्ष इतक्या रक्कमेची ४ कामे प्रगतीत असून उर्वरित ६ कामे निविदा स्तरावर आहेत.

या व्यतिरिक्त जिल्हा रुग्णालय व प्रादेशिक मनोरुग्णालय, रत्नागिरी येथील इमारतीमधील किरकोळ बदल व आवश्यक डागडूजी या कामासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने दि.०२/०९/२०२२ अन्वये रु.५.०० कोटी मंजूर झालेले असून सदर दुरुस्तीची कामे या निधीतून करावयाची आहेत. त्यानुषंगाने रु.४९६.५० लक्षची अंदाजपत्रके उपभोक्ता विभागाकडे मंजूरी सादर करणेत आली असून मंजूरी प्राप्त झालेनंतर उर्वरित कामे आवश्यक निविदा प्रक्रिया पार पाडून करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील धुळे ते नाशिक दरम्यान उड्डाणपूलाच्या बांधकामास सुरुवात करण्याबाबत

**(२९) ४९७७७ (१८-०१-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ वर धुळे ते नाशिक दरम्यान एकूण ६ उड्डाणपूल बांधण्यास राष्ट्रीय प्राधिकरणाने तत्त्वतः मान्यता दिली असल्याचे दिनांक ५ नोव्हेंबर, २०२२ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामांच्या प्रशासकीय बाबींची पूर्तता करून तातडीने काम सुरू करण्यासाठी शासन निधी उपलब्ध करून देणार आहे काय,
(३) असल्यास, कधीपर्यंत कामाला सुरुवात करण्यात करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२२-०२-२०२३) :**(१) मुंबई ते आग्रा महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे. धुळे- नाशिक दरम्यान एकुण ८ उड्डाणपूलांना तात्विक मंजुरी मिळाली आहे.
(२) सदरहू उड्डाणपूलाचे बांधकाम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण करणार असून त्यासाठीची आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.
(३) सक्षम प्राधिकरणाकडून मंजुरी आणि निधी उपलब्ध केल्यावर निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असून तद्नंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील एन्रॉन पुलाच्या दुरूस्तीबाबत

**(३०) ४९८१८ (१८-०१-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिनांक २१ व २२ जुलै, २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टी व महापुरामध्ये गुहागर-विजापूर आणि मुंबई-गोवा

या दोन राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या चिपळूण येथील एन्रॉन पूलाचा एक पिलर खचून दोन स्लॅब क्षतिग्रस्त झाल्याने पुलावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सभागृहात झालेल्या चर्चेच्यावेळी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी सदर पुलाच्या दुरूस्तीसाठी सन २०२१-२२ च्या पूरहानी कार्यक्रमांतर्गत ८ कोटी रूपयांना मान्यता देण्यात आली असून माहे मे, २०२२ अखेरपर्यंत या कामाची निविदा काढली जाईल व काम सुरू केले जाईल असे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिलेल्या आश्वासनाप्रमाणे निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय आणि ही प्रक्रिया पूर्ण होवून दुरूस्तीचे काम सुरू झाले असल्यास कामाची सदयस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२२-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सद्यस्थितीत सदरचे काम प्रगतीत असून नोव्हेंबर २०२३ पर्यन्त पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भानसविहरा (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथे धान्याची काळ्या बाजारात विक्री होत असल्याबाबत

**(३१) ४९८२५ (१८-०१-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भानसविहरा (ता. नेवासा, जिल्हा अहमदनगर) येथे काळ्या बाजारात विक्रीसाठी नेण्यात येणाऱ्या स्वस्त धान्य दुकानातील रेशनच्या गहू व तांदळाच्या ४ लाख २४ हजार ८०० रुपयांच्या चारशे गोण्या (टेम्पो क्र. एमएच ०४ सीए ९२९१) पुरवठा विभागाने जप्त केल्याचे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्याविरुद्ध कोणता गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१३-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) प्रस्तुत प्रकरणी संबंधीतांविरुद्ध पोलिस ठाणे, नेवासा येथे गु.र.नं.९०४/२०२२, जिवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ चे कलम ३,६ (क), ७ व ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे सासवड मार्गे बोपदेव घाट रस्त्याची दुरस्ती करण्याबाबत

**(३२) ४९८९८ (१८-०१-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे ते सासवड (मार्गे बोपदेव घाट) ह्या रस्त्याच्या बोपदेव घाटाच्या टप्प्यातील मार्गावर अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडणे, धोकादायक वळणावर कठडे किंवा भराव नसणे इ. कारणामुळे सदर रस्ता वाहतूक सुरक्षेच्यादृष्टीने धोकादायक झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणत्या उपापयोजना केल्या, त्याचे उपाययोजनांचे स्वरूप आणि त्यासाठी येणारा खर्च यांचा तपशील काय,

(३) असल्यास, या रस्त्याच्या प्रत्यक्ष दुरुस्तीच्या कामास सुरुवात होऊन ते पूर्ण होण्यास सुमारे किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) सदर घाटाच्या लांबीमधील ५२ मी. संरक्षक भिंतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. २.४० कि.मी लांबीत डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
५ कि.मी. लांबीतील रस्त्यावरील खड्डे भरण्यात आले असून रस्ता वाहतूकी करीता सुस्थितीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील अती रहदारीच्या रस्त्यांची दर्जोन्नती करण्याबाबत**

**(३३) ४९९१६ (१८-०१-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला,चांदवड व मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यातील रहदारीच्या दर्जाचे रस्ते राज्यमार्ग म्हणून दर्जोन्नत करण्यासाठी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दि.१५ जून २०२२ रोजी शासनास पाठवलेला प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे लोकप्रतिनिधींनी दि.७ नोव्हेंबर २०२२ तसेच दि.१५ ऑगस्ट २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे निवेदनाअन्वये दर्जोन्नती लवकर करण्याबाबत मागणी केलेली आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येवला तालुक्यातील रहदारीच्या ग्रामीण व इतर जिल्हा मार्ग रस्त्याची दर्जावाढ करून प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नती करण्यासाठी दि.१९ ऑक्टोबर २०२० रोजी मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी पाठवलेल्या प्रस्तावातील अ.नं १ चा रस्ता दर्जोन्नतीसाठी प्रलंबित असल्यामुळे हा रस्ता दर्जोन्नत करण्याकरीता लोकप्रतिनिधींनी दि.२९ सप्टेंबर २०२२ व दि.१८ ऑक्टोबर २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे निवेदनाअन्वये मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,प्रश्न भाग (१) व (२) मधील अतिरहदारीच्या रस्त्यांची दर्ज्जोन्नती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे. नाशिक जिल्यातील येवला, चांदवड व मालेगांव तालुक्यातील रस्ते राज्यमार्ग म्हणून दर्जोन्नत करण्यासाठी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचे दि.१६/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन रस्ते दर्जोन्नतीचा शासन निर्णय दि.२५/०१/२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(२) होय, हे खरे आहे. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचे दि.१९/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये येवला तालुक्यातील ग्रामीण व इतर जिल्हा मार्ग रस्त्याची दर्जावाढ करुन प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नती करण्यासाठी पाठवलेल्या प्रस्तावातील अ.नं.(१) या रस्त्याच्या दर्जोन्नतीचा शासन निर्णय दि. ०६/१२/२०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(३) वरील (१) व (२) प्रमाणे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भाषा संचालनालयाच्या माध्यमातून प्रत्येक स्पर्धा परीक्षा मराठीतून घेण्याचे धोरण ठरविण्याबाबत**

**(३४) ४९९८३ (१८-०१-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भाषा संचालनालयाच्या माध्यमातून प्रत्येक स्पर्धा परीक्षा मराठीतूनच घेण्याविषयी धोरण ठरवावे असे निर्देश औरंगाबाद खंडपीठाने दिल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनुषंगाने शपथपत्र दाखल करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०२-०३-२०२३) :** (१) नाही, भाषा संचालनालयाच्या माध्यमातून प्रत्येक स्पर्धा परीक्षा मराठीतूनच घेण्याविषयी धोरण ठरवावे असे निर्देश औरंगाबाद खंडपीठाने विभागास तसेच विभागाच्या अधिपत्याखालील भाषा संचालनालयास दिले असल्याचे आढळून आले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे ते सातारा महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत**

**(३५) ५००८० (१८-०१-२०२३). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.योगेश सागर (चारकोप), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे ते सातारा महामार्गाच्या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम संथगतीने होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामार्गाचे रुंदीकरण करण्याचे काम मागील दहा वर्षापासून प्रलंबित असून या महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने अनेक दुर्घटना घडत असतानाही प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामास केव्हा सुरुवात करण्यात आली आहे, सदर कामाची सद्य:स्थिती काय आहे तसेच या महामार्गाचे काम संथगतीने होण्याची कारणे काय आहेत व हे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-०२-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.
पुणे- सातारा राष्ट्रीय महामार्ग केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे. सवलत करारानुसार प्रकल्प पूर्ण होण्याची नियोजित तारीख ३० मार्च,२०१३ होती. परंतू पुणे सातारा महामार्गाचे बहुतांशी काम ३०.०४.२०२२ रोजी पुर्ण झाले आहे.
(२) रस्त्यावरील सर्व खड्डे भरण्यात आलेले असून रस्ता वाहतूकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. महामार्गाच्या दोन्ही बाजूस नागरीकरण वाढल्यामुळे सेवा रस्त्याच्या दोन्ही बाजूस नागरीकांनी भराव केल्यामुळे पाण्याचा निचरा होण्यास अडचण होते. त्यामुळे ब-याच ठिकाणचे सेवा रस्ते खराब होतात.
(३) व (४) पुणे सातारा महामार्गाचे काम सन २०१० साली सुरु झाले.पुणे सातारा महामार्गाचे १३७.६६ कि.मी. काम पूर्ण झाले असून उर्वरीत २.६९ कि.मी.लांबीत खालील ठिकाणी काम पूर्ण करण्यासाठी अडचणी आहेत.
१. शिंदेवाडी जिल्हा सातारा येथील उड्डाणपुलाच्या पोहोच मार्गातील अतिक्रमण काढण्यास स्थानिकांचा विरोध असल्यामुळे रस्त्याच्या कामास विलंब झाला.सद्यस्थितीत काम प्रगतीत आहे.
२. किकवी, ता.भोर,जि.पुणे व शिवरे,जि.पुणे येथे पी.यु.पी. होता त्यास स्थानिक लोकांनी विरोध करुन व्ही.यु.पी.ची मागणी केली. तसेच खेड शिवापूर, जिल्हा पुणे येथील मुळ अंदाजपत्रकात पादचारी पुलाची मंजूरी होती. परंतू स्थानिक लोकांनी विरोध करुन व्ही.यु.पी.ची मागणी केली. त्यानुसार सदरील प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयास मंजूरीसाठी पाठविण्यात आलेले आहेत.

---

### केंद्र शासनाच्या गिव्ह इट अप योजनेद्वारा रेशनकार्डवर मिळणारे धान्य बंद करण्यात येणार असल्याबाबत

**(३६) ५००९२ (१८-०१-२०२३). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या गिव्ह इट अप योजनेद्वारा ज्या कार्डधारकांमधील कोणतीही व्यक्ती शासकीय सेवेत असल्यास, दुचाकी व पेट्रोलवर चालणारे वाहन असल्यास, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ५९ हजार रुपये असल्यास तसेच घराचे बांधकाम सिमेंट क्रॉक्रिटचे असल्यास अशा कार्डधारकांना रेशनकार्डवर मिळणारे धान्य बंद करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विरोधात अनेक ठिकाणी आंदोलन करण्यात आले असून कोल्हापूर जिल्हयातील कागल येथे तहसिल कार्यालयावर दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी मोर्चा काढण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रेशनकार्डवरील धान्य पूर्ववत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-०३-२०२३) :** (१) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अनुदानित अन्नधान्यासाठी विहीत केलेल्या निकषांनुसार दारिद्र्य रेषेखालील (पिवळी) सर्व शिधापत्रिका तसेच ग्रामीण भागातील ₹ ४४,०००/- व शहरी भागातील ₹ ५९,०००/- पर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असलेल्या दारिद्र्यरेषेवरील (एपिएल-केशरी) शिधापत्रिकाधारकांना अनुदानित अन्नधान्याचा लाभ मिळण्यासाठी पात्र ठरविण्यात आले आहे.

उपरोक्त पात्र लाभार्थ्यांपैकी ज्या लाभार्थ्यांना अनुदानित अन्नधान्याचा लाभ घ्यावयाचा नसेल अशा लाभार्थ्यांना सदर अन्नधान्य नाकारण्याचा पर्याय उपलब्ध करुन देण्यासाठी “अनुदानातून बाहेर पडा ” (Opt Out of Subsidy) ही योजना सुरु करण्याचा निर्णय दिनांक १९.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे. रास्तभाव दुकानातून नियमितपणे अन्नधान्य मिळण्याबाबत व अन्नधान्य मिळण्यासाठी वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा ₹२ लक्ष करण्याकरिता लाल बावटा बांधकाम व्यवसाय कामगार संघटना यांनी मोर्चा काढून निवेदन दिले आहे.

(३) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या ७००.१३ लक्ष इतक्या इष्टांकाच्या मर्यादेत लाभार्थ्यांची निवड करणे अपरिहार्य असून त्यानुसार अनुदानित अन्नधान्य मिळण्यासाठी वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अनुदानित अन्नधान्यासाठी विहीत केलेल्या निकषांनुसार पात्र ठरविण्यात आलेल्या लाभार्थ्यांना नियमितपणे अन्नधान्य उपलब्ध करुन देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाळवी (ता. एटापल्ली, जि.गडचिरोली) गावातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबाबत

**(३७) ५००९८ (१८-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यामधील एटापल्ली तालुक्यातील वाळवी गावात बांबूपासून बनविलेल्या भिंती व ताडीच्या झाडाच्या बुंध्याचा फळ्यासारखा वापर करुन तेथील शिक्षक विद्यार्थ्यांना विद्यार्थी शिक्षण देत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील गावात माडिया जमातीची ३० ते ४० कुटुंब घनदाट जंगलात राहत असून भौतिक सुविधा नसतानाही शिक्षणाचे महत्व ओळखून अडचणींवर मात करत आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावात सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०२-०३-२०२३) :**(१) व (२) हे खरे आहे.
मौजा वाळवी हे गाव दुर्गम भागात असतांनाही सदर गावात प्रशासन व गावातील स्थानिक नागरिक/पदाधिकारी यांचे सहकार्याने आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना धोका होऊ नये यादृष्टीने लगतच्या मोकळया जागेत पारंपारिक पध्दतीने स्वच्छ व सुंदर परिसर तयार करून अध्यापनाचे काम सुरू आहे.
(३) सन २०२२-२३ च्या नियोजनात जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत एक वर्गखोली बांधकाम मंजूर करण्यात आले असून, काम पुर्ण करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शालेय शिक्षकांच्या पुरस्काराबाबत**

**(३८) ५०१५० (१८-०१-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शालेय शिक्षकांना दिले जाणारे पुरस्कार जाहीर झालेले नसल्याने शिक्षण विभागाला पुरस्कारांचा विसर पडला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षक पुरस्कार केंद्राच्या धर्तीवर शिक्षक दिनी दिनांक ५ सप्टेंबर रोजी प्रदान केले जातात परंतु यावेळी प्रदान होऊ शकले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुरस्कारप्राप्त शिक्षकांना पुरस्कार प्रदान करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०१-०३-२०२३) :** (१) (२) (३) व (४)
राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराचे निकष सुधारीत करून सदर पुरस्कार क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार या नावाने राबविण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २८ जून,२०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.या शासन निर्णयातील अटी, शर्ती व निकषांनुसार दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुरस्कार घोषित करण्यात आले. तथापि विधानपरिषदेच्या व्दिवार्षिक निवडणूकीच्या आदर्श आचार संहितेमुळे पुरस्कार वितरण कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला.पुरस्कार दिनांक २४ फेब्रुवारी,२०२३ रोजी वितरीत करण्यात आले आहेत.

---

**गोंदिया जिल्हयातील प्रमुख जिल्हामार्ग क्र. ४१ केशोरी ते लाखांदूर रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३९) ५०४५९ (१८-०१-२०२३). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्हयातील प्रमुख जिल्हामार्ग क्र. ४१ केशोरी ते लाखांदूर रस्त्याचे काम २०१८ पासून सुरु असून वडेगाव ते पुयार रस्त्याचे काम प्रलंबित असणे, सदर ३ कि.मी.चा हा रस्ताचे केवळ खडीकरण केले असल्याने तसेच रस्त्यावरील खड्डयामुळे नियमित अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८ मध्ये सदर प्रमुख जिल्हा मार्गाचे काम सुरु झाले असले तरी काम पूर्ण करण्यासाठी मागील तीन वर्षात पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात न आल्यामुळे कंत्राटदारांनी कामे बंद केली आहेत तसेच संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग सदर रस्त्याचे डांबरीकरण करण्यास उदासिन असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तेथील नागरीक व संबंधित लोकप्रतिनिधींनी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित यंत्रणेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
विहित कालावधीत रस्त्यांचे काम पूर्ण झाले आहे.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ब्रम्हपूरी व सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथील रेल्वे क्रॉसिंगवरील रेल्वे उडाण पुलाच्या बांधकामाबाबत**

**(४०) ५०५१० (१८-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी व सिंदेवाही येथील रेल्वे क्रॉसिगवर रेल्वे उडाण पुलाचे बांधकाम करण्यासाठी बांधकाम विभागाच्या अर्थसंकल्प २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये प्रशासकीय मान्यतेसह मंजूरी देण्यात आलेली असतांना सुध्दा या दोन्ही बांधकामास शासनाने माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान परिपत्रक काढून स्थगिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकप्रतिनिधींनी उक्त दोन्ही बांधकामांना दिलेली स्थगिती उठविण्याबाबत दिलेल्या निवेदनावर मा.मुख्यमंत्री यांनी अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिंनाक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निर्देश देऊन सुध्दा संबंधित विभागाने अघापही स्थगिती उठविलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कामांना दिलेली स्थगिती उठवून सदर पुलाचे बांधकाम तातडीने पुर्ण होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
मुख्य सचिव यांचेमार्फत प्राप्त झालेल्या मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निदेशानुसार सा.बां.विभागाने शासन पत्र क्र. आरएमआर २०२२/प्र.क्र.१२४/रस्ते-१,दि.२३/०७/२०२२ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्ते उपक्षेत्रांतर्गत अर्थसंकल्पित असलेल्या राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, समुद्र धूप प्रतिबंधक बंधारे, रेल्वे उड्डाणपूल व इमारती उपक्षेत्रांतर्गत निरीक्षण बंगले, विश्रामगृहे, शासकीय कार्यालयीन व निवासी इमारती घटकांतर्गत तसेच रस्ते परिरक्षण दुरुस्ती मधील विशेष दुरुस्ती व पूरहानी दुरुस्तीची दि.०१.०४.२०२१ पासून ज्या कामांच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत, मात्र कार्यादेश दिलेले नाहीत किंवा कार्यादेश देऊनही कामे सुरु झाली नाहीत अशा कामांना शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात आली.

(२) व (३) हे खरे नाही.

शासन पत्र क्र. आरएमआर २०२२/प्र.क्र.१२४ (भाग-१३)/रस्ते-१, दि.११/११/२०२२ पत्रान्वये मा.मंत्री (सा.बां) यांचेकडून प्राप्त निर्देशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या नवीन पुल, पुल पुनर्बांधणी, पुलाची दुरुस्ती, पुल जोड रस्ते (बांधणे/दुरुस्त करणे), घाट रस्ते सुधारणा, रेल्वे उड्डाणपूल या कामांवरील स्थगिती उठविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-नाशिक महामार्गावरील आसनगाव येथील भुयारी मार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(४१) ५०७१८ (१८-०१-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नाशिक महामार्गावर शहापूर तालुक्यातून जाणाऱ्या आसनगाव येथे सुरु असलेल्या भुयारी मार्गाच्या कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,

(२) असल्यास, या रस्त्याचे काम मंद गतीने सुरु असल्यामुळे त्याठिकाणी वाहतूक कोंडी होत असून अपघाताचे प्रमाणही वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भुयारी मार्गाचे काम त्वरीत पूर्ण करावे अन्यथ: आंदोलन करण्याचा इशारा एका राजकीय पक्षाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या भुयारी मार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२२-०२-२०२३) :** (१) मुंबई-नाशिक महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मुंबई-आग्रा महामार्गावरील वडापे-गोंदे ह्या खंडात ठाणे जिल्ह्यात उड्डाणपुलांची ४ कामे हाती घेतली असून आसनगाव येथे Vehicular Underpass चे काम प्रगतीपथावर आहे. सदरहू काम हे ३५ टक्के पूर्ण झाले असून service Road लवकरच पूर्ण होतील. VUP च्या काँक्रिट भिंती उचलण्यात आल्या असून लवकरच Slab टाकण्यात येईल.

(२) काम योग्य गतीने सुरु असून ह्या कामापासून फक्त ६०० मी. नाशिककडे रेल्वेचेही पुलाचे (ROB) काम सुरु आहे. ह्या दोन्ही सलग कामांमुळे रविवारी वगैरे सुट्टीच्या दिवशी Peak Period मध्ये काही काळ वाहतुक कोंडी होत असते, प्रगतीपथावरील कामांमुळे ही कोंडी स्वाभाविक आणि अपरिहार्य आहे. मात्र, अपघातांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत नाही.

(३) आंदोलनाचा इशारा देणारे पत्र राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणास प्राप्त झाले असून त्यावर स्थानिक कार्यकर्त्यांशी चर्चा करुन उचित कार्यवाही करण्यात आली असून सदर काम लवकरात लवकर पुर्ण करण्याचे प्राधिकरणाचे नियोजन आहे.

(४) काम तातडीने पूर्ण होण्याकरीता संबंधित कंत्राटदाराकडून Revised Work Program घेऊन त्यानुसार काम करण्यात येत आहे. भरावासाठी Pond Ash उपलब्ध करण्याचे ही प्रयत्न केले जात आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर व वाडा (जि. ठाणे) तालुका जोडण्यासाठी वैतरणा नदीवर पूल बांधणेबाबत**

**(४२) ५०७४२ (१८-०१-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील शहापूर-वाडा तालुका जोडणेसाठी राज्य मार्ग खर्डी-परळी-उज्जैनी रा.मा.७७ वरील वैतरणा

नदीवर मोठा पूल बांधणेबाबत अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे व मुख्य अभियंता कोकण सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नदीवर मोठा पूल मंजूर झाल्यास सदर दोन तालुके खर्डी (ता.शहापूर) रेल्वे स्थानकांशी जोडले जाऊन २० ते २५ हजार नागरीकांना रोजगारांचे साधन उपलब्ध होऊ शकते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सर्वेक्षण होऊन लोकप्रतिनिधी यांनी अनेक वेळा मागणी करुन देखील विभागाकडून दुर्लक्ष होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०३-२०२३) :** (१) हो, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) प्रश्नाधीन पूलाच्या बांधकामाबाबत निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

## घेरडी-जवळा-कडलास (जि.सोलापूर) रस्त्यांच्या निकृष्ट बांधकामाबाबत

**(४३) ५०९१७ (१८-०१-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील घेरडी-जवळा-कडलास या रस्त्यांचे काम करताना ठेकेदाराने कोणत्याही प्रकारचे खोदकाम न करता आहे त्याच रस्त्यावर खडी टाकून डांबरीकरण केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याचे खोदकाम, सिलकोट व कार्पेट सुद्धा न करता रस्त्यावर केवळ खडी टाकून निकृष्ट दर्जाचे डांबरीकरण केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले व तदनुसार ठेकेदार व संबंधित यंत्रणेच्या उप अभियंत्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही,

(२) हे खरे नाही,

(३) सदर कामे मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणे पुर्ण करण्यात आलेले आहेत. सदर कामाची गुणवत्ता योग्य राखली असुन, सदर कामावरील बांधकाम साहित्यांचे चाचणी अहवाल प्राप्त असुन विहित मानकाप्रमाणे निष्कर्ष प्राप्त आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जव्हार (जि.पालघर) सार्वजनिक बांधकाम विभागात भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४४) ५०९४५ (१८-०१-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील जव्हार सार्वजनिक बांधकाम विभागात सन २०१९ ते सन २०२२ या तीन वर्षाच्या

कालावधीमध्ये ५०० कोटी पेक्षा जास्त निधी खर्च झाला असून यात भ्रष्टाचार झाल्याने शिवक्रांतीचे अध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी, पालघर व अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे यांचेकडे चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार भ्रष्टाचार करणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-०२-२०२३) :** (१) होय.
(२) अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांच्या चौकशी अहवालानुसार तक्रारीतील मुद्दे मोघम स्वरुपाचे आढळून आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील पॉज मशीनचे सर्व्हर डाऊन असल्याने नागरिकांना धान्यापासून वंचित रहावे लागत असल्याबाबत

**(४५) ५१००३ (१८-०१-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील रेशन दुकानात ऑनलाइन पद्धतीने धान्य वितरणासाठी वापरण्यात येणाऱ्या पॉज मशीनचे सर्वर सतत डाऊन रहात असल्याने नागरिक धान्यापासून वंचित रहात असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिवाळी सणाच्या काळात अनेक गरीब नागरिक धान्यापासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे रेशन दुकानदार व ग्राहक यांच्यात अनेक वाद होत असल्याने रेशन दुकानदार यांनी जिल्हा अन्नधान्य पुरवठा अधिकारी त्यांच्याकडे अद्ययावत मशीन उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन गरीब नागरिकांना अन्नधान्य वितरण वेळेत उपलब्ध होण्याकरिता अद्यावत असलेली पॉस मशीन उपलब्ध करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२८-०२-२०२३) : (१)** हे अंशत: खरे आहे, सार्वजनिक वितरण व्यवस्थेंर्तगत AePDS (Adhar enabled Public Distribution System) प्रणाली मार्फत धान्य वितरण करण्यात येते. AePDS प्रणालीच्या सर्व्हरमध्ये तसेच Cloudstrat यांचाकडील Cloud Server वर तांत्रीक बिघाड झाल्याने अन्नधान्याचे वाटप करतांना काही कालावधीसाठी तांत्रिक अडचणी येते होत्या. तथापि, सदर तांत्रिक अडचण तात्काळ दूर करण्यात आली व अन्नधान्य वितरण सुरळीत सुरू करण्यात आले. माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये नागपूर जिल्हयात ई-पॉस मशीनद्वारे ९७% लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले

तांत्रीक अडचणीमुळे लाभार्थ्याला अन्नधान्य मिळाले नाही तर सदर महिन्याचे धान्य ई-पॉस मशीन मध्ये कॅरी फॉरवर्ड सुविधा उपलब्ध करुन त्यापुढील महिन्यात लाभार्थ्यांला धान्याचा लाभ देण्यात येतो. त्यानुसार लाभार्थी अन्नधान्यापासुन वंचित राहू नये, याबाबत काळजी घेण्यात येते.
(२) हे खरे नाही, सार्वजनिक वितरण व्यवस्थेची अंमलबजावणी करीत असतांना दिवाळी सारख्या महत्त्वाच्या सणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सणासुदीला कोणताही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचीत राहू नये याकरीता योग्य ते नियोजन व दक्षता जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्या कडून घेण्यात येते. माहे ऑक्टोंबर,२०२२ या दिवाळी सणाच्या महिन्यात नागपूर जिल्हात ई-पॉस मशीनद्वारे ९७.५०% लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे, सार्वजनिक वितरण प्रणालीच्या संगणकीकरण प्रकल्पांतर्गत बायोमेट्रीक पध्दतीने ई-पॉस उपकरणाच्या सहाय्याने अन्नधान्य वितरीत करण्यात येते. याकरिता सन २०१७ मध्ये तीन System Integrators यांची नियुक्ती करून राज्यातील सर्व रास्तभाव दुकानांमध्ये ई-पॉस उपकरणे बसविण्यात आली होती. सदर ई-पॉस उपकरणे कालबाह्य झाली असल्याने नवीन ई-पॉस उपकरणे रास्तभाव दुकानांमध्ये उपलब्ध करून देण्याची मागणी रास्तभाव दुकानदार यांचा संघटनेने केली आहे.
(४) सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण प्रकल्पांतर्गत रास्तभाव दुकानांत नवीन ई-पॉस मशीन बसविण्याकरीता दि.०१.०७.२०२२ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार नवीन ई-पॉस मशीन बसविण्याकरीता ३ System Integrators यांची निवड करण्यात आली असुन सदर System Integrators यांना Work Order देण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे. मान्यतेनंतर रास्तभाव दुकानदार यांना लवकरात लवकर नवीन ४G तंत्रज्ञान व Iris Scanner या तंत्रज्ञान असणाऱ्या मशीन उपलब्ध करून देण्यात येतील.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हापरिषदेत शिकणाऱ्या प्राथमिक शाळेतील ओबीसी विद्यार्थ्यांना (मुलांना) मोफत शालेय गणवेश देण्याबाबत

**(४६) ५१०७४ (१८-०१-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.राजेश पवार (नायगांव), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हापरिषदेत शिकणाऱ्या प्राथमिक शाळेतील ओबीसी विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणवेश मिळत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०१-०३-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) प्रस्तुत योजनेंतर्गत शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वी मधील सर्व मुली, अनुसूचित जाती व जमातींचे मुले तसेच दारिद्र्य रेषेखालील पालकांची मुले यांना मोफत गणवेशाचा लाभ देण्यात येतो. उर्वरित दारिद्र्यरेषवरील पालकांच्या पाल्यांना मोफत गणवेश देण्याबाबतची बाब प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आरटीई अनुदान थकीत असल्याबाबत

**(४७) ५११३७ (१८-०१-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षण हक्क कायद्यानुसार खाजगी शाळांमध्ये २५ टक्के गोर गरीब मुलांना मोफत प्रवेश व शालेय साहित्य वाटपासाठी शासनाकडून देण्यात येणारे आरटीई अनुदान गेल्या पांच वर्षापासून थकीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाखो रुपयांची थकबाकी शासनाकडून वेळेत मिळत नसल्याने शाळांचा खर्च भागवण्यासाठी शिक्षण संस्थाचालकांना आर्थिक संकटाचा सामाना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच अनुदानाची रक्कम वेळच्या वेळी शासनाकडून अदा करण्यात येत नसल्याने आरटीई प्रवेशांवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने आरटीई प्रवेशापोटी शाळांना देय असलेली रक्कम तात्काळ अदा करण्याच्या अनुषंगाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-०३-२०२३) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) सन २०२२-२३ या वर्षाकरिता रू.२०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे त्यापैकी रू.८४ कोटी निधी वितरित केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात केंद्र शासनाच्या अन्न अधिकार कायदयानुसार रेशनचा पुरवठा करण्याबाबत

**(४८) ५१२४० (१८-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात केंद्र शासनाच्या अन्न अधिकार कायदयानुसार रेशनचा पुरवठा होत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही महिन्यांपासून अमरावती जिल्हयातील रेशनच्या धान्य दुकानामधून गव्हाचा पुरवठा बंद केला असून त्याऐवजी तांदुळ तर कुठे मक्याचा पुरवठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकरी लाभार्थ्यांसाठी आवश्यक गव्हाची उचल थांबविण्यात येत असल्याचे भारतीय अन्न महामंडळाने त्यांच्या दि. ३१ मे, २०२२ च्या पत्रान्वये कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर योजनेंतर्गत गव्हाचा पुरवठा सुरळीत होण्याबाबत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने शेतकरी योजनेंतर्गत आवश्यक अन्नधान्याची खरेदी खुल्या बाजारातून करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२२-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही. राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पात्र लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत नियमित तसेच प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत मोफत अन्नधान्याचे वितरण सुरळितपणे करण्यात आलेले आहे.
(२) एपीएल (केशरी) योजनेतील शेतकरी लाभार्थ्यांसाठी गहू उपलब्ध होणार नसल्याचे भारतीय अन्न महामंडळाने त्यांच्या दिनांक ३१ मे, २०२२ च्या पत्रान्वये कळविले आहे. सबब शेतकरी योजनेतील लाभार्थ्यांना केवळ तांदळाचे वाटप करण्यात येत होते. तसेच केंद्र शासनाच्या खरेदी धोरणानुसार विकेंद्रित खरेदी योजनेअंतर्गत आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत राज्यात खरेदी करण्यात आलेल्या भरडधान्याचे (मका/ज्वारी/बाजरी/ रागी) राज्यातच वाटप करण्यात येते. त्याअनुषंगाने राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पात्र लाभार्थ्यांना भरडधान्याचे वितरण तेवढ्याच परिमाणात गव्हाचे परिमाण कमी करुन करण्यात येते.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) हे खरे नाही. सदर लाभार्थ्यांना अन्नधान्याऐवजी थेट रोख रक्कम हस्तांतरण (Direct Benefit Transfer-DBT) योजना कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे.

---

**जत (जि.सांगली) तालुका प्राथमिक शिक्षण विभागाचे कार्यालय व एक भव्य शिक्षक भवन उभारण्याबाबत**

**(४९) ५१५२९ (१८-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील जत तालुका विस्ताराने मोठा असल्याने प्राथमिक शिक्षकांच्या सोयीसाठी संख अप्पर तहसील कार्यालयाच्या धर्तीवर प्राथमिक शिक्षण विभागाचे कार्यालय संख, उमदी व माडग्याळ या एकाच ठिकाणी करावे अशी मागणी शिक्षकांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर तालुक्यामध्ये एक भव्य शिक्षक भवन उभारण्याची मागणीही अनेक वर्षापासून शिक्षकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक शिक्षण विभागाचे कार्यालय एकाच ठिकाणी करण्याबाबत व शिक्षक भवन उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२७-०२-२०२३) :** (१) व (२) अशी मागणी अद्याप शासनाकडे प्राप्त नाही

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

---

**नागपूर शहरातील सिमेंट रत्यांवरील विदयुत खांब हटविण्याबाबत**

**(५०) ५१६०८ (१८-०१-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील रूंदीकरण व सिमेंटीकरण करण्यात असलेल्या रस्त्याचे बांधकामा अंतर्गत झिंगाबाई टाकळी ते गोधनी तथा रामेश्वरी येथील रस्त्याच्या मध्ये असलेल्या विदयुत खांबामुळे नागरीकांची गैरसोय होऊन अपघात होत असल्याने माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितित सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागाकडून विद्युत खांब स्थलांतरित करणे करिता निविदा प्रक्रीया सुरु आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर खांब स्थलांतरित करण्याची कार्यवाही केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-०३-२०२३) :** (१ ) सदर रस्त्यावर वाहन चालकाने वाहन निष्काळजीपणे व हयगईत चालविल्याने ट्रान्सफार्मरला धडक दिल्याने अपघात झाल्याची नोंद संबंधीत पोलीस स्टेशन मध्ये आहे.

(२) सा.बां.विद्युत विभाग,नागपूर यांच्या मार्फत निविदा प्रक्रिया पूर्ण करुन विद्युत खांब स्थलांतरीत करण्याचे काम प्रगतीत आहे.

(३) विद्युत खांब स्थलातरीत करण्याचे काम माहे मार्च २०२३ अखेर पर्यत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.